**<u>प्रेसनोट दि. २८/०५/२०१९</u>**

**<u>सिंहगडरोड पोलीस ठाणे,पुणे</u>**

**सिंहगडरोड पोलीस स्टेशन वडगाव मार्शल कर्मचारी सचिन तुपसौंदर व सुहास मोरे यांची उत्कृष्ट कामगिरी**

---------------------------------------------------------------------------------

दि. १८/०५/२०१९ रोजी रात्रौ १०.०० वा. चे सुमारास फिर्यादी नामे कुलदिप रामभारत सिंह, वय २७ वर्षे, धंदा-पानटपरी चालक, रा. चाळ नं. ७, रुम नं. ३१८, साने गुरुजी नगर, पीएमसी कॉलनी, सदाशिव पेठ, पुणे ३०. व त्यांचा कामगार गौरीशंकर सिंह असे नेहमीप्रमाणे त्यांचे प्रदिप पान शॉप, विजया चेंबर्स, हिंगणे खुर्द, पुणे या पानटपरीवर असताना त्यांचे तोंड ओळखीचा इसम नामे किरण उजानी, रा. सिंहगडरोड, पुणे हा त्याचे तीन मित्रांसह त्यांचे पानटपरीवर आला. त्याने फिर्यादी यांना ०५ स्पेशल सिगारेट मागीतले व सिगारेटचे पैसे दिले नाहीत. त्यामुळे फिर्यादी यांनी त्याला आत्ताचे व पुर्वीचे उधारीचे राहीलेले पैसे मागीतले असता, त्याने पैसे देणार नाही, तुला काय करायचे ते कर असे म्हणुन फिर्यादी यांना वाईट-वाईट शिवीगाळ करुन फिर्यादी नामे कुलदिप रामभारत सिंह व त्यांचा भाऊ संदिप सिंह यांस हाताने धक्काबुक्की केली असता फिर्यादी व त्यांचा भाऊ यांनी विरोध केला असता किरण उजानी व त्याचे मित्रांपैकी एकाने फिर्यादी यांचे डोक्यावर बिअरची बाटली मारुन त्यांना गंभीर जखमी केले म्हणुन फिर्यादी यांनी त्यांचेविरुध्द तक्रार दिल्याने सिंहगडरोड पो.स्टे. गुन्हा रजि.नं. ३८४/२०१९ भादंवि कलम ३२४,३२३,५०४,५०६,३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असुन त्याचा तपास पोहवा २४२४ पी.डी.कडु हे करीत आहेत.

दाखल गुन्हयाचा पुढील तपास चालु असताना दि. २७/०५/२०१९ रोजी वडगाव मार्शलवरील रात्रपाळीचे कर्मचारी पोशि ८७४४ सचिन तुपसौंदर व पोशि १०११४ सुहास मोरे यांना त्यांच्या गुप्त बातमीदाराकडुन बातमी मिळाली की, दाखल गुन्हयातील आरोपी हे राजीव गांधी वसाहत विठ्ठलवाडी, सिंहगडरोड, पुणे येथे येणार असल्याची माहिती मिळाल्याने मार्शलवरील कर्मचारी यांनी बातमीदारासह राजीव गांधी वसाहत विठ्ठलवाडी, सिंहगडरोड, पुणे येथे जावुन थांबुन सकाळी ०८.३० वा. चे सुमारास दोन इसम राजीव गांधी वसाहत विठ्ठलवाडी, सिंहगडरोड, पुणे येथे संशयास्पदरीत्या फिरताना दिसले असता बातमीदाराने सदर इसमांकडे इशारा करुन हेच आरोपी असल्याचे सांगीतले असता मार्शल वरील कर्मचारी पोशि ८७४४ सचिन तुपसौंदर व पोशि १०११४ सुहास मोरे यांनी सदर इसमांना ताब्यात घेवुन त्यांना त्यांचे नाव पत्ता विचारता त्यांनी आपले नाव १) ज्ञानेश्वर सुभाष साठे, वय २१ वर्षे, धंदा-प्लंबींग, रा. राजीव गांधी वसाहत, विठ्ठलवाडी, सिंहगडरोड, पुणे व २) फरीद गुलाब शेख, वय २५ वर्षे, धंदा-ड्रायव्हर, रा. राजीव गांधी वसाहत, विठ्ठलवाडी, सिंहगडरोड, पुणे असे नाव व पत्ते सांगीतले. त्यांच्याकडे अधिक चौकशी करता त्यांनी दाखल गुन्हा केल्याची कबुल केले तसेच त्यांच्यासोबत किरण उजानी, रा. सिंहगडरोड, पुणे (पुर्ण नाव व पत्ता माहित नाही) व इतर एक इसम (पुर्ण नाव व पत्ता माहित नाही) हे असल्याचे सांगीतले आहे.

अशा प्रकारे मार्शल कर्मचारी पोशि ८७४४ सचिन तुपसौंदर व पोशि १०११४ सुहास मोरे यांनी सिंहगडरोड पो.स्टे. गुन्हा रजि.नं. ३८४/२०१९ भादंवि कलम ३२४,३२३,५०४,५०६,३४ अन्वये दाखल गुन्हयातील आरोपी नामे १) ज्ञानेश्वर सुभाष साठे, वय २१ वर्षे, धंदा-प्लंबींग, रा. राजीव गांधी वसाहत, विठ्ठलवाडी, सिंहगडरोड, पुणे व २) फरीद गुलाब शेख, वय २५ वर्षे, धंदा-ड्रायव्हर, रा. राजीव गांधी वसाहत, विठ्ठलवाडी, सिंहगडरोड, पुणे यांना ताब्यात घेतल्याने त्यांना दाखल गुन्हयात दि. २७/०५/२०१९ रोजी १०.३० वा. अटक करुन उत्कृष्ट कामगिरी केली आहे.